क्र.प्राशि/अनुदान/वाढवर्ग/यु.मा./पुवि/०२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय,
दिनांक : 27 NOV 2002

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ.

विषय : विनाअनुदानित/कायम विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना सन २००१-०२ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढ/अतिरिक्त तुकडी वर्ग मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील क्र.प्राशसं/०२/यु.मा./६०७३३/अ-५११, दि. ११.११.२००२ चे पत्र.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली मंजूर केलेल्या शाळांना वर्ग/तुकडया सन २००१-०२ या वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात शासन अनुदान देणार नाही तसेच भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही व 'सदरचे वर्ग प्रत्यक्षात सुरु असतील' या अटीवर संदर्भाधीन पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | कपार्डिकेश्वर प्रायमरी इंग्लिश मिडीयम स्कूल, ओतूर ता. जुन्नर जि. पुणे. | इंग्रजी | जि.प. | ३री व ४थी या प्रथम वर्ग. | मंजूर |

सदर प्राथमिक शाळांना वर्ग/तुकडयांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

स्वाक्षरीवर दि. व. सं. बांधी
सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

१. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

यांचेकडे संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

परवानगी वर्ष :- २०१०-२०११
माध्यम :- इंग्रजी
**कायम विना अनुदान**

जा.क्र.शिउसं/ माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०११/११११८०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :- 3 JUN 2011

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे.

विषय :- प्रथम मान्यताबाबत..(सन २०१०-२०११ साठी एक वर्षासाठी)
**कपर्दिकेश्वर सेकंडरी इंग्लिश स्कूल,ओतूर ता.जुन्नर जिल्हा पुणे.**

संदर्भ-
१. शासन पत्र क्र. नमाशा-२००९/(१५२/०९)माशि-१,दि.२७.०७.२००९
२. या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य ३/१२/नमाशा/पुवि/०९-१०/ दिनांक २७.०८.२००९
३.शासन निर्णय क्रमांक नमाशा-२००७/(९८६/२००७)/माशि-१ क्रमांक १ व २ आणि शासन निर्णय क्रमांक नमाशा-२००७/(१००६/२००७)/ माशि-१ क्रमांक-३ दिनांक १९.१०.२००७
४. शासनपत्र क्रमांक माशानु-२००८(५९४/०८)/माशि-१ दिनांक ७.७.२००८
५.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र क्रमांक जिप/माध्य/प्रमा/२४६८/१० दिनांक १३.०९.२०१०
६.या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य ३/१२/नमाशा/मान्यता/पुवि/२०१० ९५९-६२ दिनांक १८.०१.२०११
७.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र क्रमांक जिप/शिक्षण/माध्य/१३३२/११ दिनांक १८.०४.२०११

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१ , ३.२ , व ३.३ अन्वये **प्रतिभा शिक्षण संस्था,ओतूर ता.जुन्नर जिल्हा पुणे संचलित कपर्दिकेश्वर सेकंडरी इंग्लिश स्कूल,ओतूर ता.जुन्नर जिल्हा पुणे.** या माध्यमिक शाळेच्या इयत्ता **आठवीच्या वर्गास सन** २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षासाठी जून-**२०१० पासून <u>एक वर्षासाठी कायम</u> <u>विना अनुदान तत्वावर</u>** आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक )जिल्हा परिषद यांनी संबंधित शाळा खालील अटींची पुर्तता करीत आहे किंवा कसे १. याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्यावेळी खालील अटी संस्थेने/शाळेने पुर्ण केल्या आहेत किंवा कसे ? याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा. **पुढील कालावधीसाठी (सन २०११-२०१२ साठी ) सक्षम मान्यतेचा प्रस्ताव पाठविण्याची संबंधित शाळेची जबाबदारी राहील.**

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तिची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दर वर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची (मुलां-मुलींसाठी)सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११.शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सूचनांची पुर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.

(मागे पहा.)

१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
**१७. जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

टीप :- **जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.४.०९ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित संस्थेने/शाळेने विहित मुदतीत पूर्तता न केल्यास सदरचे आदेश आपोआप रद्द होतील याची नोंद घ्यावी.सन २०११-२०१२ साठी तात्पुरती प्रथम मान्यता सुरु ठेवणेस परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करावा.**

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

(बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१करिता

**प्रत माहितीस्तव व तात्काळ कार्यवाहीसाठी,**

१. मुख्याध्यापक, कपर्दिकेश्वर सेकंडरी इंग्लिश स्कूल,ओतूर ता.जुन्नर जिल्हा पुणे.
२. अध्यक्ष/सचिव प्रतिभा शिक्षण संस्था,ओतूर ता.जुन्नर जिल्हा पुणे जिल्हा सोलापूर
३. निवडनस्ती.